


दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | बुधवार, 27 मे 2026 | अंक क्र. 24 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4








Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com


# परळीत दिवसाढवळ्या कोयता दहशत !

## शिंदे सेनेच्या नेत्यावर प्राणघातक हल्ला ; मोंढा परिसरात काही काळ दुकाने बंद

### हल्लेखोर फरार, शहरात भीतीचे वातावरण

■ परळी वैजनाथ - प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील परळी शहरात भरदिवसा कोयत्याने हल्ला करत दहशत माजवल्याची धक्कादायक घटना घडली आहे. शिंदे सेनेचे वरिष्ठ नेते शिवाजी शिंदे यांच्यावर मोंढा परिसरातील त्यांच्या 'रिद्धी-सिद्धी' हॉटेलमध्ये काही अज्ञात हल्लेखोरांनी धारदार शस्त्रांनी जीवघेणा हल्ला चढवला. या हल्ल्यात शिंदे गंभीर जखमी झाले असून त्यांना पुढील उपचारासाठी स्वाराती रुग्णालय, अंबाजोगाई येथे हलविण्यात आले आहे.

या घटनेनंतर मोंढा परिसरात काही काळ तणावपूर्ण शांतता पसरली होती. भीतीच्या वातावरणामुळे अनेक दुकाने बंद ठेवण्यात आली होती. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी



घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला असून हल्लेखोर फरार आहेत. या प्रकरणाचा तपास परळी संभाजीनगर पोलीस करत आहेत.

जखमी अवस्थेत उपचार घेत असताना शिवाजी शिंदे यांनी सांगितले की, "सुरवसे नावाच्या मुलाची माझी कोणतीही ओळख नाही. मात्र त्याचा आणि माझ्या मुलाचा काही वाद झाला असल्याचे समजले. काल रात्री तो माझ्या गावी घरी आला होता आणि सर्व गावासमोर मला व माझ्या मुलाला अश्लील शिवीगाळ करत होता. त्यावेळी मी त्याची समजूत काढून परत पाठवून दिले.

दुपारी मी माझ्या पत्नीसमवेत मोंढा परिसरातील हॉटेलमध्ये बसलो असताना तोच मुलगा आणि त्याचे तीन साथीदार अचानक आले. त्यांनी कोयत्याने माझ्यावर हल्ला केला. डोक्यावर वार करण्याचा प्रयत्न झाला, तो मी हातावर घेतल्याने हाताची बोटे गंभीर जखमी झाली. हात-पायावरही अनेक वार करण्यात आले. माझ्या पत्नीला देखील मारहाण करण्यात आली. तसेच हॉटेलमधील काही रक्कमही घेऊन गेले. हा मला मारण्याचा प्रयत्न होता की लुटीचा, हे समजत नाही. या घटनेमुळे परळी शहरात खळबळ उडाली असून आरोपींना तातडीने अटक करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपासाची चक्रे वेगाने फिरवली आहेत.



# मित्रच निघाला ठकसेन ; खोट्या निकाल यादीचा बनाव !

## तुझे नाव यादीत आले आहे म्हणत, पार्टीसाठी 2 हजार रुपयेही घेतले; सहाय्यक अभियंता पदावर सरकारी नोकरी लावून देतो म्हणत केली तब्बल 8 लाखांची फसवणूक

■ परळी- नितीन ढाकणे

महापारेषण (महावितरण) कंपनीत सहाय्यक अभियंता पदावर सरकारी नोकरी लावून देतो, असे आमिष दाखवून एका सुशिक्षित बेरोजगार तरुणाची ₹८ लाखांची आर्थिक फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात जालना जिल्ह्यातील पिता-पुत्राविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारदार तरुण प्रदिप पांडूरंग मुंडे (वय २७, रा. राहणार तळेगाव, ता. परळी वैजनाथ, जि. बीड) याने २०२० मध्ये जालना येथील मत्स्योदरी इंजिनीअरिंग कॉलेजमधून बी.ई. इलेक्ट्रिकलचे शिक्षण पूर्ण केले. कॉलेज हॉस्टेलवर असताना त्याची मैत्री ऋषीकेश सुनील खराबे (रा. एकलहेरा, ता. अंबड, जि. जालना) याच्याशी झाली. प्रदिप याने डिसेंबर २०२४ मध्ये पुणे येथे महापारेषणच्या सहाय्यक अभियंता पदाची परीक्षा दिली होती. ही माहिती मिळताच ऋषीकेश याने प्रदिपशी संपर्क साधला. "मी पैशे घेऊन मुलांना सरकारी नोकरीला लावतो. इतरांकडून २५ लाख घेतो, पण तू मित्र असल्याने तुझ्याकडून १५ लाख रुपये घेईन आणि तुझे काम करून देतो," असे आमिष ऋषीकेशने दाखवले. जानेवारी २०२५ मध्ये प्रदिप, त्याचे वडील आणि चुलते यांनी तीर्थपुरी (तालुका अंबड) येथील ऋषीकेशच्या ऑफिसमध्ये जाऊन भेट घेतली. तिथे ८ लाख रुपये आधी आणि उर्वरित ७ लाख रुपये नोकरी लागल्यानंतर देण्याचे ठरले. त्यानुसार १७ जानेवारी २०२५ रोजी ऋषीकेश खराबे आणि त्याचे वडील सुनील बाबूराव खराबे हे परळी तालुक्यातील तळेगाव येथे आले. प्रदिपच्या कुटुंबाने त्यांना 1 लाख नगदी आणि बँक ऑफ महाराष्ट्रचा 7 लाखांचा चा चेक (क्र. १७८८७) असे एकूण ८ लाख रुपये सुपूर्द केले.




### खोट्या निकाल यादीचा बनाव

■ १८ फेब्रुवारी २०२५ रोजी ऋषीकेशने व्हॉट्सअॅपवर महापारेषणची एक बनावट निकाल यादी पाठवली, ज्यामध्ये प्रदिपचे नाव ९४ व्या क्रमांकावर होते. "तुझे नाव यादीत आले आहे, पार्टीसाठी २ हजार रुपये पाठव," असे सांगून त्याने प्रदिपकडून ऑनलाईन पैसेही उकळले. मात्र, २३ फेब्रुवारी रोजी जेव्हा महापारेषणचा अधिकृत निकाल लागला, तेव्हा प्रदिपचे नाव त्यात नव्हते. प्रदिपने विचारणा केली असता, ऋषीकेशने "तुझे नाव वेटिंग लिस्टमध्ये येईल," असे सांगून वेळ मारून नेली.

### जीवे मारण्याची धमकी

■ काही महिने वाट पाहिल्यानंतरही वेटिंग लिस्ट न लागल्याने प्रदिपने आपले ८ लाख रुपये परत मागितले. मात्र ऋषीकेशने त्याचा नंबर ब्लॉक लिस्टमध्ये टाकला. त्यानंतर प्रदिप आपल्या नातेवाईकांसह एकलहेरा (तालुका अंबड) येथे पैसे मागण्यासाठी गेला असता, आरोपी पिता-पुत्राने पैसे देण्यास नकार दिला. तसेच एक खोटा तयार केलेला बाँड दाखवून, "पुन्हा पैसे मागण्यासाठी आलास तर जीवे मारून टाकीन," अशी धमकी दिली. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर प्रदिप मुंडे याने परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात धाव घेतली. प्रदिप मुंडे यांच्या तक्रारीवरून परळी ग्रामीण पोलिसांनी २२ मे २०२६ रोजी रात्री २०:४५ वाजता दोन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

■ १) ऋषीकेश सुनील खराबे (वय २८ वर्षे)

■ २) सुनील बाबुराव खराबे (वय ५० वर्षे, दोघे रा. एकलहेरा, ता. अंबड, जि. जालना)

■ यांच्यावर (BNS, 2023): कलम ३(५), ३१८(४), ३३६(३), आणि ३५१(२) अन्वये गुन्हा नोंद केला. सदरील घटनेचा तपास पोलीस निरीक्षक मजहर अबुतालिब सैय्यद यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अंकुश ज्ञानेश्वर निमोणे हे करत आहेत.

# नाशिकमध्ये मद्यधुंद चालकाचा अंगावर काटा आणणारा थरार

■ नाशिक वृत्तसंस्था

नाशिकमधील पंचवटी परिसरात एका मद्यधुंद कार चालकाचा थरार पहायला मिळाला आहे. टाळकुटेश्वर मंदिराच्या अलीकडे असलेल्या गोदावरी नदीच्या पात्रात या मद्यधुंद चालकाने आपली चारचाकी गाडी थेट गोदावरीच्या पात्राच्या आत घुसवली. हा परिसर भाविक आणि पर्यटकांमुळे नेहमी गजबजलेला असतो मात्र सुदैवाने या वेळेस तितकीशी गर्दी नसल्याने मोठा अनर्थ टळला आहे. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झालेली नाही, मात्र गाडीचे मोठे नुकसान झाले आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, आज मंगळवारी (दि. २६) ही घटना घडली. चालक प्रचंड मद्याच्या नशेत होता, त्यामुळे त्याचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि कार थेट नदीपात्रात जाऊन कोसळली. सुदैवाने या घटनेत मोठा अनर्थ टळला आहे. या संपूर्ण घटनेचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत असून, नेटकऱ्यांकडून मद्यपी चालकावर तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

नदीपात्र परिसरात भाविक आणि नागरिकांची नेहमीच वर्दळ असते. मात्र, अपघात झाला त्या वेळी परिसरात कोणीही नसल्याने मोठा अनर्थ टळला. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी आणि प्रशासनाने घटनास्थळी धाव घेतली. क्रेनच्या साहाय्याने वाहन बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरू होते.



# दारू दुकानावरील हिशोबाच्या वादातून मजुराची हत्या स्थानिक गुन्हे शाखेने (LCB) आरोपीला ठोकल्या बेड्या!

■ बीड: प्रतिनिधी

शिवाजीनगर पोलीस स्टेशनच्या हद्दीत एका दारूच्या दुकानात हिशोबाच्या वादावरून झालेल्या मारहाणीत मजुराचा जागीच मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली होती. या गुन्ह्यातील फरार मुख्य आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या (LCB) विशेष पथकाने बालेपीर परिसरातून अत्यंत शिताफीने ताब्यात घेतले आहे.

फिर्यादी संगीता उमेश दळवी (वय २८ वर्षे, रा. गोरेवस्ती, बालेपीर, बीड) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचे पती उमेश नवनाथ दळवी (वय ३५ वर्षे) हे बालेपीर येथील एका दारूच्या दुकानात कामाला होते. दिनांक २३/०५/२०२६ रोजी दुकानातील हिशोबात घोळ झाल्याचे कारण पुढे करत आरोपी शेख इरफान उर्फ लाला याने उमेश दळवी यांना बेदम मारहाण केली. या मारहाणीत गंभीर दुखापत झाल्याने उमेश यांचा मृत्यू झाला. यापूर्वीही आरोपीने 'काम व्यवस्थित करत नाही' म्हणून त्यांना मारहाण केली होती. याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुरं नं. १२४/२०२६ नुसार भारतीय न्याय संहितेचे (BNS) कलम १०३(१), ११५(१), ३५१(२), ३५२ सह अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा (Atrocities Act) कलम ३(१)(४), ३(१)(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि खटावकर यांचे एक विशेष पथक समांतर तपास करत होते. दिनांक २६/०५/२०२६ रोजी हा आरोपी बालेपीर परिसरातच लपून बसल्याची खात्रीशीर माहिती गुप्त बातमीदारामार्फत पथकाला मिळाली.

मिळालेल्या माहितीच्या आधारे पथकाने तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय बातमीदारांच्या मदतीने बालेपीर परिसराला वेढा घालून आरोपी शेख इरफान उर्फ (लाला) शेख समद (वय ३८ वर्षे, रा. इंदिरा गांधी शाळेजवळ, आमराई, नगर रोड, बालेपीर, ता. जि. बीड) याला शिताफीने ताब्यात घेतले. आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली असून, त्याला पुढील तपासासाठी तपास अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, बीड यांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. सदरची कामगिरी प्रभारी पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके मॅडम, सहाय्यक पोलीस अधीक्षक श्री. व्यंकटराम साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.



# प्रा.प्रदीप दत्तात्रय कामथेकर (सीए): "ज्ञान, प्रामाणिकता आणि प्रशासनिक कुशलतेचा त्रिवेणी संगम: प्रा. (सीए) प्रदीप दत्तात्रय कामथेकर!"





**शिक्षण ही आयुष्यभर चालणारी प्रक्रिया आहे, हे आपल्या कृतीतून सिद्ध करणारी ज्ञानव्रती!**

---

**नाईट कॉलेज ते मुंबई विद्यापीठाचे 'फायनान्स ऑफिसर'; संघर्षातून यशाचे शिखर गाठणारे एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व.**

---

**केवळ पदव्यांची श्रीमंतीच नाही, तर ३० वर्षांच्या अध्यापनातून हजारो विद्यार्थ्यांचे आयुष्य घडवणारे आदर्श शिक्षक!**

भारतीय उच्च शिक्षण व्यवस्थेमध्ये काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की ज्यांनी केवळ अध्यापनापुरते मर्यादित न राहता शिक्षण, संशोधन, प्रशासन आणि समाजकारण या सर्व क्षेत्रांत ठसा उमटवलेला असतो. प्रा. (सीए) प्रदीप दत्तात्रय कामथेकर हे असेच एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व आहे. गेल्या तीन दशकांहून अधिक काळ त्यांनी शिक्षण क्षेत्रात दिलेले योगदान, प्रशासनातील त्यांच्या कामगिरीची भक्कम नोंद आणि संशोधनातील त्यांच्या कार्याची दखल ही सर्वच बाबी त्यांना एक आदर्श शिक्षक व प्रशासक म्हणून ओळख निर्माण करून देतात. कोरोना काळातील सर्वात मोठे आव्हान: ८ वर्षांचे प्रलंबित ऑडिट केवळ ३२ महिन्यांत पूर्ण करण्याचा ऐतिहासिक विक्रम!

प्रा. कामथेकर यांची शैक्षणिक पार्श्वभूमी अत्यंत भक्कम आहे. त्यांनी एम.कॉम., एलएलएम., एम.ए. (अर्थशास्त्र), एम.ए. (राज्यशास्त्र), एफसीए (चार्टर्ड अकाउंटंट) आणि पीएच.डी. अशा विविध पदव्या संपादन केल्या आहेत. इतकेच नव्हे तर ते सध्या मानसशास्त्र विषयात इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ येथून एम.ए. पदवीचे शिक्षण घेत आहेत. तसेच ते मुंबई विद्यापीठातून 'कायदेविषयाशी संबंधित विषयात' पी.एच.डी. चे शिक्षण घेत आहेत. त्यांच्या या सतत शिकण्याच्या वृत्तीमुळे त्यांची ज्ञानलालसा आणि प्रगतीशील दृष्टिकोन स्पष्ट होतो. शिक्षण हे केवळ पदवीपुरते मर्यादित नसून ती एक आयुष्यभर चालणारी प्रक्रिया आहे, याचे ते जिवंत उदाहरण आहेत.

त्यांचा अध्यापनाचा प्रवास तब्बल ३० वर्षांचा आहे. या काळात त्यांनी विद्यार्थ्यांना केवळ विषयज्ञान दिले नाही, तर त्यांना जीवनमूल्ये, प्रामाणिकता आणि सामाजिक जबाबदारी यांची जाणीवही करून दिली. मुंबईतील प्रतिष्ठित आर. ए. पोदार महाविद्यालयात ते प्राध्यापक आहेत आणि त्यांनी तेथे लेखाशास्त्र विभागप्रमुख म्हणूनही कार्य केलेले आहे. त्यांच्या अध्यापन शैलीत स्पष्टता, सखोलता आणि विद्यार्थीकेंद्रित दृष्टिकोन दिसून येतो. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये ते अत्यंत लोकप्रिय शिक्षक म्हणून ओळखले जातात.

प्रशासनिक क्षेत्रातही त्यांची कामगिरी उल्लेखनीय आहे. त्यांनी मुंबई विद्यापीठ आणि होमी भाभा राज्य विद्यापीठ येथे वित्त व लेखा अधिकारी म्हणून महत्त्वाची जबाबदारी सांभाळली आहे. विशेष म्हणजे, मुंबई विद्यापीठाच्या १६६ वर्षांच्या इतिहासात चार्टर्ड अकाउंटंट म्हणून नियुक्त होणारे ते पहिले वित्त व लेखा अधिकारी ठरले. ही बाब त्यांच्या कौशल्याची आणि प्रामाणिकतेची साक्ष देते. त्यांच्या प्रशासनिक कारकिर्दीत अनेक महत्त्वपूर्ण कामगिरी घडल्या. त्यांनी २०१३ ते २०२१ या कालावधीतील आठ वर्षांची प्रलंबित लेखापरीक्षण अहवालांची पूर्तता केवळ ३२ महिन्यांत करून दाखवली. ही कामगिरी अत्यंत आव्हानात्मक होती, विशेषतः कोरोना महामारीच्या काळात. त्यांच्या या कार्याची दखल महाराष्ट्र विधानसभेत घेण्यात आली आणि चंद्रकांत पाटील यांनी त्यांचे विशेष कौतुक केले.

त्यांनी मुंबई विद्यापीठाला NAAC मानांकनात ३.६५ असा उच्च दर्जा मिळवून देण्यातही महत्त्वपूर्ण योगदान दिले. याशिवाय, त्यांनी आयकर न्यायाधिकरणात यशस्वीपणे बाजू मांडून विद्यापीठाचा लाखो रुपयांचा दंड वाचवला. त्यांच्या या कामगिरीमुळे त्यांच्या कायदेशीर आणि आर्थिक ज्ञानाची प्रगल्भता स्पष्ट होते.

संशोधन क्षेत्रातही त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे. त्यांनी 'Environmentally Benign Prawn Shell Chitin-Silver Nano Composite' या विषयावर पेटंट अर्ज दाखल केला आहे. त्यांनी 'अविष्कार' संशोधन महोत्सवात विद्यापीठ आणि राज्यस्तरावर प्रथम क्रमांक मिळवला आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली तीन विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पदवी संपादन केली आहे, ही त्यांच्या संशोधन मार्गदर्शन क्षमतेची साक्ष आहे. लेखन क्षेत्रातही त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांनी लेखाशास्त्र आणि वित्तीय व्यवस्थापन या विषयांवर अनेक पुस्तके लिहिली आहेत. ही पुस्तके विशेषतः बी.कॉम. विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरतात. त्यांच्या पुस्तकांमध्ये विषयाची सुस्पष्ट मांडणी, उदाहरणांसह स्पष्टीकरण आणि परीक्षाभिमुख दृष्टिकोन दिसून येतो.

त्यांच्या आयुष्यातील आणखी एक प्रेरणादायी पैलू म्हणजे त्यांचा संघर्षमय प्रवास. त्यांनी नाईट कॉलेजमध्ये शिक्षण घेत HSC परीक्षेत प्रथम क्रमांक मिळवला आणि सुवर्णपदक पटकावले. या यशामागे त्यांची मेहनत, चिकाटी आणि आत्मविश्वास दिसून येतो. त्यांनी जीवनातील अडचणींना संधीमध्ये रूपांतरित करत यशाची शिखरे गाठली.

प्रा. कामथेकर यांना सामाजिक कार्यासाठीही अनेक पुरस्कार मिळाले आहेत. २०१५ मध्ये वेस्टर्न इंडिया रीजनल कौन्सिल (ICAI) कडून 'सोशल कॉन्ट्रिब्युशन'साठी विशेष पुरस्कार देण्यात आला. तसेच, २०१९-२० मध्ये 'नॅशनल टॅलेंट सर्च अवॉर्ड'ने त्यांना सन्मानित करण्यात आले.

एकूणच, प्रा. (सीए) प्रदीप दत्तात्रय कामथेकर यांचे व्यक्तिमत्त्व हे ज्ञान, प्रामाणिकता, परिश्रम आणि नेतृत्व यांचा सुंदर संगम आहे. त्यांनी आपल्या कार्यातून शिक्षण क्षेत्रात एक आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या जीवनप्रवासातून विद्यार्थ्यांना, शिक्षकांना आणि प्रशासकांना प्रेरणा मिळते. त्यांच्या कार्याची व्याप्ती आणि प्रभाव लक्षात घेतल्यास, ते केवळ एक शिक्षक किंवा प्रशासक नसून एक मार्गदर्शक, संशोधक आणि समाजहितैषी व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांचा हा प्रेरणादायी प्रवास पुढील पिढ्यांसाठी दिशादर्शक ठरेल, यात शंका नाही.




विधानसभेत अधिवेशनात मुंबई विद्यापीठाच्या ऑडिट संबंधी मा. पृथ्वीराज चव्हाणांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्द्यावर मा. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री नामदार श्री. चंद्रकांत दादा पाटील ह्यांनी निवेदन देताना मुंबई विद्यापीठाच्या वित्त व लेखा अधिकारी ह्यांचे कौतुक केले.

# मोटेगावकर अडचणीत; CBIला घरातूनच मिळाला महत्त्वाचा साक्षीदार

■ नवी दिल्ली वृत्तसंस्था

देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या पेपरफुटी प्रकरणात आता आणखी एक मोठा आणि धक्कादायक खुलासा समोर आला आहे. या बहुचर्चित प्रकरणाचा तपास करणाऱ्या केंद्रीय अन्वेषण विभागाने (CBI) लातूरमधील शिक्षण क्षेत्रातील प्रसिद्ध व्यावसायिक आणि आरोपी शिवराज मोटेगावकर यांच्याभोवतीचा तपासाचा फास आणखी घट्ट केला आहे. या प्रकरणात मोटेगावकर यांच्यासाठी अडचणी वाढण्याची चिन्हे दिसत असून, त्यांच्या विरोधातील पुरावे अधिक बळकट करण्यासाठी CBIने थेट त्यांच्या घरातूनच एक महत्त्वाचा साक्षीदार तयार केल्याची माहिती समोर आली आहे.

पेपर लीक प्रकरणाचे धागेदोरे हरियाणा, राजस्थान आणि महाराष्ट्रासह अनेक राज्यांपर्यंत पोहोचले आहेत. या प्रकरणात आतापर्यंत अनेक आरोपींना अटक करण्यात आली असून, प्रश्नपत्रिका तयार करण्याच्या प्रक्रियेशी संबंधित काही शिक्षकांनाही तपास यंत्रणांनी ताब्यात घेतले आहे. आता या संपूर्ण रॅकेटकडून प्रश्नपत्रिका विकत घेणारे पालक आणि विद्यार्थी देखील CBIच्या रडारवर आले आहेत.

दरम्यान, CBIने या प्रकरणात आरोपी शिवराज मोटेगावकर यांच्या मुलाची देखील चौकशी केली. या चौकशीतून अत्यंत महत्त्वाची माहिती समोर आल्याचे सूत्रांनी सांगितले आहे. तपासादरम्यान मोटेगावकर यांच्या मुलाने अनेक धक्कादायक खुलासे केल्याची माहिती मिळत आहे.



सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, CBIने पुण्यात मोटेगावकर यांच्या मुलाची सविस्तर चौकशी केली. या चौकशीदरम्यान त्याने दिलेल्या जबाबामुळे तपासाला मोठी दिशा मिळाल्याचे सांगितले जात आहे. मुलाने चौकशीत सांगितले की, "वडिलांनी NEET परीक्षेच्या सुमारे दहा दिवस आधीच फिजिक्स, केमिस्ट्री आणि बायोलॉजी या तिन्ही विषयांच्या प्रश्नपत्रिका उपलब्ध करून दिल्या होत्या."

या कथित कबुलीजबाबामुळे शिवराज मोटेगावकर यांच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे. तसेच, NEET पेपर लीक रॅकेट परीक्षेच्या बऱ्याच आधीपासून सक्रिय असल्याची शक्यता अधिक बळकट झाली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, CBI आता मोटेगावकर यांच्या अल्पवयीन मुलाला या प्रकरणात मुख्य साक्षीदार (Key Witness) बनवण्याच्या तयारीत आहे. तसे झाल्यास या प्रकरणातील तपासाला निर्णायक वळण मिळू शकते.

याआधीही तपास यंत्रणांनी लातूरमधील एका नामांकित बालरोगतज्ज्ञ डॉ. शिरुरे यांना या प्रकरणात साक्षीदाराचा दर्जा दिला आहे. त्यांच्या मुलासाठी देखील लीक झालेली प्रश्नपत्रिका विकत घेण्यात आल्याचा संशय तपास यंत्रणांना आहे. त्यामुळे या प्रकरणातील आर्थिक व्यवहार, संपर्क साखळी आणि प्रश्नपत्रिका वितरणाची यंत्रणा उघड होण्याची शक्यता वाढली आहे.

सध्या CBIकडून मोटेगावकर यांच्या मुलाने दिलेला जबाब आणि डॉ. शिरुरे यांच्याशी संबंधित माहितीची डिजिटल पुरावे, मोबाईल डेटा, कॉल रेकॉर्ड्स, आर्थिक व्यवहार आणि इतर कागदपत्रांच्या आधारे कसून पडताळणी केली जात आहे. या तपासातून मिळणारे पुरावे आणि साक्षीदारांचे जबाब एकमेकांशी जुळल्यास NEET पेपरफुटी प्रकरणातील अनेक मोठी नावे आणि प्रभावशाली व्यक्तींचे चेहरे समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

एकूणच, देशभर गाजत असलेल्या NEET पेपर लीक प्रकरणात CBIने उचललेले हे पाऊल अत्यंत महत्त्वाचे मानले जात असून, शिवराज मोटेगावकर यांच्यावरील आरोप अधिक गंभीर बनण्याची शक्यता निर्माण झाली आहे. आगामी काळात या प्रकरणातून आणखी मोठे खुलासे होण्याची शक्यता तपास यंत्रणांकडून व्यक्त केली जात आहे.




दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायालय अंतर्गत)

# नीट पेपरफुटी विरोधात एसएफआय व डीवायएफआयचे बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर तीव्र निदर्शने

**बीड | प्रतिनिधी**

वैद्यकीय शिक्षणासाठी रात्रंदिवस मेहनत घेणाऱ्या सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी केंद्र सरकारने खेळ केला असून नीट परीक्षेतील पेपरफुटी आणि निकालातील संशयास्पद प्रकारांमुळे देशातील शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत झाला आहे, असा आरोप करत स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया (एसएफआय) आणि डेमोक्रॅटिक यूथ फेडरेशन ऑफ इंडिया (डीवायएफआय) यांच्यावतीने बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर तीव्र निदर्शने करण्यात आली. यावेळी आंदोलकांनी केंद्र सरकार आणि नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) विरोधात जोरदार घोषणाबाजी करत दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. आंदोलकांचे म्हणणे आहे की, नीट परीक्षेतील पेपरफुटी हा केवळ घोटाळा नसून लाखो प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या कष्टांची दिवसाढवळ्या झालेली लूट आहे. विद्यार्थ्यांनी अनेक वर्षे प्रचंड मेहनत घेऊन परीक्षा दिली, मात्र पेपरफुटीमुळे त्यांच्या स्वप्नांवर पाणी फिरले आहे.







एसएफआय आणि डीवायएफआयने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मागील अनेक वर्षांपासून वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षा परीक्षांमध्ये गैरप्रकार आणि पेपरफुटीच्या घटना सातत्याने समोर येत आहेत. त्यामुळे देशातील परीक्षा व्यवस्थेची विश्वासार्हता धोक्यात आली असून विद्यार्थ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. संघटनांनी मागणी केली की, नीट पेपरफुटी प्रकरणी जबाबदार असलेल्या एनटीएच्या अध्यक्षांचा तसेच केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा तात्काळ राजीनामा घेण्यात यावा. तसेच या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

या आंदोलनात डीवायएफआयचे राज्य अध्यक्ष मोहन जाधव, राज्य कमिटी सदस्य विशाल देशमुख, सुहास झोडगे, प्रशांत मस्के, महेश देशमुख, शरद नांदे, इस्माईल शेख आदी सहभागी झाले होते. तसेच एसएफआयचे राज्य अध्यक्ष रोहिदास जाधव, जिल्हा अध्यक्ष सत्यजित मस्के, जिल्हा सचिव पवन चिंचणी, अभिषेक शिंदे, हमीद शेख, प्रथमेश उपाडे, विशाल राठोड, तसेच विद्यार्थिनी प्रतिनिधी पायल, कावेरी आणि सृष्टी यांनीही आंदोलनात सहभाग घेतला. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्या भ्रष्ट परीक्षा व्यवस्थेविरोधात देशभर तीव्र आंदोलन उभारण्यात येईल, असा इशाराही संघटनांच्या वतीने यावेळी देण्यात आला.

# रमाबाई आंबेडकर: संघर्षातील शांत शक्ती

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महान कार्याचा विचार करताना त्यांच्या आयुष्यातील प्रत्येक टप्प्यावर खंबीरपणे उभ्या राहिलेल्या रमाबाई आंबेडकर यांचे व्यक्तिमत्त्व अत्यंत आदराने आणि कृतज्ञतेने स्मरणात येते. भारतीय समाजव्यवस्थेतील अन्याय, अस्पृश्यता, गरिबी, सामाजिक बहिष्कार आणि मानवी अपमानाच्या काळोखात बाबासाहेबांनी उभी केलेली परिवर्तनाची मशाल तेजाने प्रज्वलित राहिली, त्यामागे रमाबाईंचे त्यागमय जीवन आणि शांत पण समर्थ सहकार्य मोठ्या प्रमाणात कार्यरत होते. बाबासाहेबांच्या आयुष्याचा इतिहास जितका संघर्षाचा आहे, तितकाच तो रमाईंच्या त्यागाचा आणि सहनशीलतेचाही आहे. म्हणूनच २७ मे रोजी येणारा रमाबाई आंबेडकर स्मृतिदिन हा केवळ एका व्यक्तीच्या स्मृतीचा दिवस नसून त्याग, समर्पण, सहनशीलता आणि स्त्रीशक्तीच्या अद्वितीय योगदानाचे स्मरण करणारा दिवस आहे.



रमाबाई आंबेडकर यांचा जन्म ७ फेब्रुवारी १८९८ रोजी कोकणातील दापोली तालुक्यातील वणंद या गावात झाला. त्यांचे वडील भिकू धुतरे हे अत्यंत गरीब कुटुंबातील मेहनती व्यक्ती होते. लहान वयातच रमाबाईंच्या आयुष्यात दुःखाचे सावट आले. आई-वडिलांचे निधन झाल्यानंतर त्यांचे बालपण अत्यंत हालअपेष्टांत गेले. आर्थिक अडचणी, उपासमार, असुरक्षितता आणि सामाजिक दुर्लक्ष अशा परिस्थितीत त्यांचे बालजीवन घडले. त्या काळात मुलींना शिक्षणाची संधी नव्हतीच; त्यात दलित समाजातील मुलींची अवस्था अधिकच बिकट होती. त्यामुळे रमाबाई औपचारिक शिक्षणापासून वंचित राहिल्या. परंतु जीवनाच्या कठोर अनुभवांनी त्यांना प्रगल्भ बनवले.

१९०६ मध्ये अवघ्या नऊ वर्षांच्या रमाबाईंचा विवाह पंधरा वर्षीय भीमराव आंबेडकर यांच्याशी झाला. हा विवाह जरी पारंपरिक पद्धतीने झाला असला तरी पुढे या नात्याने भारतीय सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात अत्यंत महत्त्वपूर्ण स्थान मिळवले. विवाहानंतर रमाबाईंच्या आयुष्यात संघर्ष अधिकच वाढला. बाबासाहेब उच्च शिक्षणासाठी झटत होते. त्यांना शिक्षणाची प्रचंड ओढ होती आणि त्यासाठी आर्थिक संकटांशी सतत लढावे लागत होते. अशा वेळी रमाबाई यांनी संसाराचा संपूर्ण भार स्वतःच्या खांद्यावर घेतला. अत्यंत गरिबीत संसार चालवताना त्यांनी कधीही तक्रार केली नाही. बाबासाहेबांच्या शिक्षणात कोणताही अडथळा येऊ नये, यासाठी त्यांनी स्वतःच्या इच्छा-आकांक्षांचा पूर्णतः त्याग केला.

त्या काळातील परिस्थिती अत्यंत कठीण होती. घरात अनेकदा अन्नधान्य नसे, मुलांचे संगोपन करणे कठीण जाई, आजारपण आणि आर्थिक विवंचना कायम असत. बाबासाहेब विदेशात शिक्षण घेत असताना रमाबाई मुंबईत अत्यंत हालअपेष्टा सहन करत होत्या. संसार चालवण्यासाठी त्यांनी अनेक संकटांचा सामना केला. काही वेळा उपाशीपोटी दिवस काढावे लागत, तरीही त्यांनी बाबासाहेबांना कधीही शिक्षण सोडून परत येण्यास सांगितले नाही. त्यांच्या मनात बाबासाहेबांच्या ध्येयाबद्दल प्रचंड विश्वास होता. शिक्षणाच्या माध्यमातून समाजाचे उद्धारकार्य बाबासाहेब करणार आहेत, याची त्यांना जाणीव होती. त्यामुळे त्यांनी स्वतःच्या वेदना मनात ठेवून बाबासाहेबांना सतत प्रेरणा दिली.

रमाबाईंचे व्यक्तिमत्त्व अत्यंत साधे, शांत आणि संयमी होते. त्यांना कोणत्याही प्रकारचा दिखाऊपणा आवडत नसे. साधी राहणी, परिश्रमशील वृत्ती आणि कुटुंबाविषयी अपार प्रेम हे त्यांच्या स्वभावाचे वैशिष्ट्य होते. त्या धार्मिक वृत्तीच्या होत्या. संकटांच्या काळात त्या देवभक्तीतून मानसिक बळ मिळवत असत. बाबासाहेब मात्र तर्कवादी आणि वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले होते. तरीही या दोघांमध्ये परस्पर आदर आणि समजूतदारपणा कायम राहिला. बाबासाहेबांनी अनेकदा रमाबाईंच्या सहनशीलतेचा आणि त्यागाचा उल्लेख अत्यंत आदराने केला आहे.

रमाबाईंच्या आयुष्यातील सर्वांत वेदनादायक बाब म्हणजे त्यांच्या मुलांचे निधन. त्यांना एकूण पाच अपत्ये झाली; परंतु त्यापैकी बहुतेक मुलांचे लहान वयातच निधन झाले. दारिद्र्य, आरोग्याच्या समस्या आणि अपुऱ्या वैद्यकीय सुविधांमुळे त्यांना आपल्या लेकरांना गमवावे लागले. या दुःखाने रमाबाई आतून खचून गेल्या होत्या. मातृत्वाच्या असंख्य वेदना त्यांनी सहन केल्या. तरीही त्यांनी बाबासाहेबांच्या कार्यात कधी अडथळा आणला नाही. उलट त्यांच्या मानसिक स्थैर्याला आधार देण्याचा प्रयत्न केला. एका आईच्या आणि पत्नीच्या भूमिकेत त्यांनी केलेला त्याग अनमोल आहे.

बाबासाहेबांचे जीवन म्हणजे सततचा संघर्ष होता. अस्पृश्यतेविरुद्धचा लढा, शिक्षणासाठीचा संघर्ष, सामाजिक न्यायासाठीचे आंदोलन, कायद्याचा अभ्यास, राजकीय जबाबदाऱ्या आणि समाजजागृती या सर्व क्षेत्रांत बाबासाहेब कार्यरत होते. या प्रत्येक टप्प्यावर रमाबाई त्यांच्यासोबत सावलीसारख्या उभ्या राहिल्या. त्यांनी स्वतःला कधीही पुढे आणले नाही; परंतु बाबासाहेबांच्या यशामागे त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे होते. समाजपरिवर्तनासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तीच्या पाठीशी उभे राहण्यासाठी जी मानसिक ताकद लागते, ती रमाबाईंकडे होती.

महाड सत्याग्रह, चवदार तळ्याचा लढा, मंदिरप्रवेश आंदोलन, गोलमेज परिषद यांसारख्या ऐतिहासिक घटनांच्या काळात बाबासाहेबांचे जीवन अत्यंत व्यस्त आणि संघर्षमय होते. या काळात रमाबाई घराची जबाबदारी सांभाळत होत्या. आर्थिक ताण, सामाजिक दबाव आणि वैयक्तिक दुःख यांचा सामना करत त्यांनी बाबासाहेबांना मानसिक आधार दिला. एका अर्थाने बाबासाहेबांच्या सामाजिक क्रांतीला आवश्यक असलेली भावनिक शक्ती रमाबाईंकडूनच मिळत होती.

रमाबाईंच्या व्यक्तिमत्त्वात असलेली सहनशीलता आजच्या समाजासाठी प्रेरणादायी आहे. त्यांनी कधीही स्वतःच्या दुःखाचे प्रदर्शन केले नाही. गरिबी, उपासमार, आजारपण, मुलांचे मृत्यू आणि सामाजिक अपमान या सर्व संकटांना त्यांनी धैर्याने तोंड दिले. त्यांच्या आयुष्याचा विचार केला तर लक्षात येते की त्या केवळ एका महान व्यक्तीच्या पत्नी नव्हत्या, तर स्वतःमध्येही एक महान व्यक्तिमत्त्व होत्या. त्यांचे योगदान शब्दांत मांडणे कठीण आहे.

रमाबाईंच्या आयुष्यातील आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे त्यांची संवेदनशीलता. घरात कोणीही उपाशी राहू नये, गरजू व्यक्तींना मदत करावी, संकटात असलेल्या लोकांना धीर द्यावा, अशी त्यांची वृत्ती होती. अत्यंत गरिबीत राहूनही त्यांनी माणुसकी जपली. त्यांचे जीवन हे करुणा आणि सहअस्तित्वाचे उदाहरण होते. त्या काळातील दलित स्त्रियांच्या जीवनातील दुःख आणि संघर्ष रमाबाईंच्या जीवनातून स्पष्टपणे दिसून येतात.

स्त्रीशक्तीचा विचार करताना अनेकदा समाज केवळ प्रसिद्ध आणि सार्वजनिक जीवनात कार्य करणाऱ्या महिलांकडे पाहतो; परंतु घराच्या चार भिंतीत राहून समाजपरिवर्तनाच्या महान कार्याला आधार देणाऱ्या स्त्रियांचे योगदानही तितकेच महत्त्वाचे असते. रमाबाई यांचे जीवन हे अशा स्त्रीशक्तीचे सर्वोच्च उदाहरण आहे. त्यांनी कुटुंब, संसार आणि सामाजिक जबाबदाऱ्या सांभाळताना दाखवलेली संयमशीलता आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी आहे.

बाबासाहेबांनी अनेकदा आपल्या लेखनात आणि भाषणांत रमाबाईंच्या त्यागाचा उल्लेख केला आहे. त्यांनी रमाबाईंना अत्यंत प्रेमाने "रमा" किंवा "रामू" असे संबोधले. बाबासाहेबांच्या आयुष्यात रमाबाईंचे स्थान किती महत्त्वाचे होते, हे त्यांच्या अनेक आठवणींमधून दिसून येते. बाबासाहेबांनी शिक्षणासाठी केलेल्या संघर्षात रमाबाईंचे सहकार्य नसते, तर कदाचित इतिहासाची दिशा वेगळी असती. कारण संघर्षाच्या काळात मानसिक आधार देणारी व्यक्तीच एखाद्याला मोठ्या ध्येयासाठी लढण्याची शक्ती देते.रमाबाईंचे आरोग्य पुढे खालावत गेले. सततची गरिबी, कष्ट, अपुरी आहारव्यवस्था आणि मानसिक ताण यामुळे त्यांची प्रकृती ढासळली. बाबासाहेब त्या काळात अत्यंत व्यस्त होते. समाजकारण, राजकारण आणि कायदेविषयक कामांमध्ये त्यांचा वेळ जात होता. तरीही रमाबाईंच्या प्रकृतीबद्दल त्यांना सतत चिंता वाटत असे. अखेर २७ मे १९३५ रोजी रमाबाईंचे निधन झाले. त्यांच्या मृत्यूने बाबासाहेब अत्यंत दुःखी झाले. त्यांनी आपल्या आयुष्यातील एक मोठा आधार गमावला होता.

रमाबाईंच्या निधनानंतर बाबासाहेब काही काळ अत्यंत खचून गेले होते. त्यांनी आपल्या आयुष्यातील संघर्षमय प्रवासात ज्यांच्यावर सर्वाधिक विश्वास ठेवला, ती व्यक्ती त्यांच्यापासून दूर गेली होती. बाबासाहेबांनी रमाबाईंच्या स्मरणार्थ अनेकदा भावनिक शब्दांत आपली कृतज्ञता व्यक्त केली. त्यांच्या जीवनातील त्यागाचे मोल त्यांनी मनापासून मान्य केले.

आजच्या काळात रमाबाई आंबेडकर यांचे जीवन नव्या पिढीसाठी प्रेरणेचा स्रोत आहे. त्यांचे जीवन आपल्याला सांगते की मोठ्या परिवर्तनामागे अनेक अनामिक त्याग असतात. समाजाला दिशा देणाऱ्या व्यक्तींच्या यशामागे त्यांच्या कुटुंबीयांचे, विशेषतः स्त्रियांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असते. रमाबाईंचे जीवन हे स्त्रीशक्तीच्या संयमी आणि समर्पित रूपाचे प्रतीक आहे.

समाजात आजही अनेक महिला विविध संकटांचा सामना करत आहेत. आर्थिक अडचणी, कौटुंबिक जबाबदाऱ्या, सामाजिक दबाव आणि असमानता या समस्यांमध्येही त्या कुटुंब आणि समाजासाठी झटत आहेत. अशा वेळी रमाबाईंचे जीवन त्यांना संघर्षातून उभे राहण्याची प्रेरणा देते. त्यांचा त्याग हा केवळ वैयक्तिक नव्हता; तो सामाजिक परिवर्तनासाठी दिलेला मूक वाटा होता.

रमाबाईंच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांचे कार्य आणि योगदान समाजासमोर मांडणे आवश्यक आहे. अनेकदा इतिहासात मोठ्या व्यक्तींची नावे प्रसिद्ध होतात; परंतु त्यांच्या संघर्षात सहभागी असलेल्या व्यक्ती दुर्लक्षित राहतात. रमाबाईंचे जीवन हे अशाच दुर्लक्षित पण अत्यंत महत्त्वाच्या योगदानाचे उदाहरण आहे. त्यांच्या स्मृती जतन करणे म्हणजे समाजातील त्याग, सहनशीलता आणि माणुसकीच्या मूल्यांना जपणे होय.

भारतीय स्त्रीच्या संघर्षमय जीवनाचे एक प्रभावी चित्र रमाबाईंच्या आयुष्यातून दिसते. त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही धैर्य गमावले नाही. कुटुंबासाठी, पतीच्या ध्येयासाठी आणि मुलांसाठी त्यांनी आयुष्यभर कष्ट केले. त्यांच्या जीवनात सुखाचे क्षण फार कमी होते; परंतु त्यांनी दुःखाला शरण न जाता त्यातून जगण्याची ताकद निर्माण केली.

रमाबाईंच्या जीवनाचा अभ्यास करताना त्या काळातील सामाजिक परिस्थितीही समजून घ्यावी लागते. दलित समाजावर होणारा अन्याय, अस्पृश्यतेमुळे मिळणारी अमानुष वागणूक, शिक्षणाचा अभाव, गरिबी आणि सामाजिक बहिष्कार या सगळ्या परिस्थितीत रमाबाई जगत होत्या. अशा काळात त्यांनी बाबासाहेबांना केवळ साथच दिली नाही, तर त्यांच्या ध्येयासाठी स्वतःचे जीवन वाहून घेतले.

आज अनेक सामाजिक आणि शैक्षणिक संस्थांद्वारे रमाबाई आंबेडकर यांच्या स्मृती जपल्या जात आहेत. त्यांच्या नावाने महिला वसतिगृहे, शैक्षणिक संस्था, सामाजिक उपक्रम आणि स्मारके उभारण्यात आली आहेत. हे केवळ स्मरणाचे प्रतीक नाही, तर स्त्रीशक्तीचा सन्मान करण्याचा प्रयत्न आहे. रमाबाईंच्या जीवनातून प्रेरणा घेऊन महिलांनी शिक्षण, स्वाभिमान आणि सामाजिक जाणीव यांचा स्वीकार करणे आवश्यक आहे.

रमाबाईंचे जीवन हे त्यागाच्या माध्यमातून इतिहास घडवणाऱ्या स्त्रीचे उदाहरण आहे. त्यांनी स्वतःचे आयुष्य प्रसिद्धीसाठी जगले नाही. त्यांना कोणत्याही पदाची किंवा सत्तेची अपेक्षा नव्हती. त्यांचे ध्येय केवळ कुटुंब आणि बाबासाहेबांच्या स्वप्नांना आधार देणे हेच होते. म्हणूनच त्यांचे योगदान अधिक मोठे वाटते. आजच्या भौतिकवादी युगात त्यांचे साधेपण आणि समर्पण समाजाला माणुसकीची जाणीव करून देते.

रमाबाईंच्या व्यक्तिमत्त्वाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांची मानसिक ताकद. संकटांच्या काळात अनेकजण खचून जातात; परंतु रमाबाई संकटांतही शांत राहिल्या. त्यांनी



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(समाजशास्त्राचे अभ्यासक)**

दुःख सहन केले, पण धैर्य सोडले नाही. त्यांच्या या वृत्तीमुळे बाबासाहेबांना समाजकार्यासाठी आवश्यक स्थैर्य मिळाले. त्यांचे जीवन हे मानसिक सामर्थ्याचे जिवंत उदाहरण आहे.

स्त्री-पुरुष समानतेच्या विचारांचा पाया मजबूत करण्यासाठी रमाबाईंचे जीवन अभ्यासणे आवश्यक आहे. स्त्रीचे योगदान केवळ घरापुरते मर्यादित नसते; ती समाजपरिवर्तनाची महत्त्वाची भागीदार असते. रमाबाई यांनी हे आपल्या आयुष्यातून सिद्ध केले. त्यांचे योगदान सामाजिक इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले जावे, इतके मोठे आहे.

रमाबाईंच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांचे विचार आणि जीवनमूल्ये नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे ही काळाची गरज आहे. त्याग, संयम, माणुसकी, सहकार्य आणि ध्येयनिष्ठा या मूल्यांची आज समाजाला अत्यंत आवश्यकता आहे. वाढती स्पर्धा, स्वार्थी वृत्ती आणि नातेसंबंधांमधील ताण यांच्या काळात रमाबाईंचे जीवन आपल्याला संवेदनशीलतेचा आणि नात्यांमधील विश्वासाचा संदेश देते.

रमाबाई आंबेडकर या नावात केवळ एका स्त्रीची ओळख नाही, तर संघर्षातून उभ्या राहिलेल्या भारतीय स्त्रीचे सामर्थ्य दडलेले आहे. त्यांनी संकटांना घाबरून न जाता त्यांच्याशी सामना केला. त्यांनी दुःखाला स्वीकारले, पण आशा सोडली नाही. त्यांच्या जीवनाचा विचार करताना मनात आदर आणि कृतज्ञतेची भावना निर्माण होते.

समाजातील प्रत्येक व्यक्तीने रमाबाईंच्या जीवनातून प्रेरणा घ्यावी. कष्ट, त्याग आणि समर्पण यांच्यामुळेच मोठे परिवर्तन घडते, हा संदेश त्यांच्या आयुष्यातून मिळतो. आज महिलांच्या सक्षमीकरणाबद्दल मोठ्या प्रमाणात चर्चा होत असली तरी त्यासाठी आवश्यक असलेली मूल्ये रमाबाईंच्या जीवनात स्पष्टपणे दिसतात. आत्मविश्वास, सहनशीलता आणि कुटुंबाविषयीची जबाबदारी यांचा सुंदर समन्वय त्यांच्या व्यक्तिमत्त्वात होता.

रमाबाईंच्या स्मृतिदिनाचे महत्त्व केवळ औपचारिक कार्यक्रमांपुरते मर्यादित राहता कामा नये. त्यांच्या जीवनाचा अभ्यास शाळा, महाविद्यालये आणि समाजसंस्थांमध्ये व्हायला हवा. त्यांच्या त्यागमय जीवनाची माहिती नव्या पिढीपर्यंत पोहोचल्यास समाजात संवेदनशीलता आणि सामाजिक जाणीव वाढेल. बाबासाहेबांच्या कार्याची मुळे समजून घ्यायची असतील, तर रमाबाईंच्या त्यागाचे महत्त्व समजून घ्यावे लागेल.

आजच्या आधुनिक समाजात कुटुंबव्यवस्थेवर अनेक प्रकारची आव्हाने आहेत. अशा काळात रमाबाईंचे जीवन कुटुंबातील परस्पर सहकार्य, विश्वास आणि त्याग यांचे महत्त्व अधोरेखित करते. त्यांनी बाबासाहेबांच्या ध्येयाला स्वतःचे ध्येय मानले. त्यांच्या संघर्षाला स्वतःचा संघर्ष समजले. म्हणूनच त्यांचे वैवाहिक जीवन केवळ संसार नव्हते, तर एका सामाजिक ध्येयासाठीची संयुक्त साधना होती.

रमाबाईंच्या आयुष्याकडे पाहताना आपल्याला स्त्रीच्या अदृश्य श्रमांचे महत्त्व समजते. घर सांभाळणे, मुलांची काळजी घेणे, संकटांना तोंड देणे आणि कुटुंबातील सदस्यांना मानसिक आधार देणे ही कामे समाज अनेकदा गृहीत धरतो. परंतु या कामांमुळेच मोठी स्वप्ने पूर्ण होतात. बाबासाहेबांच्या महान कार्यामागे रमाबाईंची हीच अदृश्य शक्ती कार्यरत होती.

रमाबाई आंबेडकर यांचे जीवन हे भारतीय समाजातील वंचित स्त्रीच्या संघर्षाचे प्रतीक आहे. त्यांनी प्रतिकूलतेतही स्वाभिमानाने जगण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या आयुष्यातील दुःख आणि त्याग समजून घेतल्याशिवाय बाबासाहेबांच्या संघर्षाचे पूर्ण चित्र समोर येत नाही. म्हणूनच रमाबाईंच्या स्मृतीचा सन्मान करणे म्हणजे सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासातील एका महत्त्वपूर्ण अध्यायाला आदर देणे होय.

रमाबाईंचे जीवन आपल्याला शिकवते की मोठेपणा हा केवळ प्रसिद्धीत नसतो, तर निःस्वार्थी कार्यात असतो. त्यांनी स्वतःसाठी काही मागितले नाही. त्यांचे संपूर्ण आयुष्य इतरांसाठी जगण्यात गेले. म्हणूनच त्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक महान वाटते. त्यांची साधी राहणी आणि उच्च विचारसरणी समाजासाठी प्रेरणादायी आहे.

आज महिलांना शिक्षण, रोजगार आणि सामाजिक सहभागाच्या अनेक संधी उपलब्ध झाल्या आहेत. तरीही अनेक महिलांना संघर्ष करावा लागतो. अशा वेळी रमाबाईंचे जीवन त्यांना मानसिक बळ देते. संकटांना सामोरे जाताना धैर्य आणि संयम कसे राखावे, हे त्यांच्या आयुष्यातून शिकण्यासारखे आहे.

रमाबाईंच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांचे स्मरण करताना केवळ श्रद्धांजली वाहून थांबणे पुरेसे नाही. त्यांच्या मूल्यांचा स्वीकार करणे आवश्यक आहे. समाजात समानता, माणुसकी आणि सहकार्याची भावना वाढवण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करायला हवेत. बाबासाहेबांनी ज्या समतामूलक समाजाचे स्वप्न पाहिले, त्या स्वप्नाच्या उभारणीत रमाबाईंचा मूक पण महत्त्वपूर्ण वाटा होता.


दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
बीड, बुधवार 27 मे 2026
Last page

# पशुखाद्य अन् चाऱ्याचे दर कडाडले; आष्टी तालुक्यातील दूध उत्पादक शेतकरी संकटात!

## दूध खरेदी दरात कपात; प्रति लिटरला मिळतोय अवघा 37 रुपये भाव

**संतोष सानप| आष्टी**

गेल्या दोन महिन्यांपासून पशुखाद्याच्या दरामध्ये सातत्याने वाढ होत असल्याने आष्टी तालुक्यातील दूध व्यवसाय कमालीचा संकटात सापडला आहे. सध्या कडक उन्हाळा असल्याने परिसरात कुठेही हिरवा चारा उपलब्ध नाही, तसेच हिरव्या चाऱ्याचे आणि कडब्याचे भावही गगनाला भिडले आहेत. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना जनावरांसाठी नाईलाजास्तव ऊस खरेदी करावा लागत आहे, मात्र उसाचे भाव आणि ऊस तोडणी करणाऱ्या मजुरांचे दरही प्रचंड वाढले आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेत उसाच्या भावात ८०० ते १००० रुपयांची वाढ झाली असून, मजुरीच्या दरातही २०० रुपयांची वाढ झाल्याचे शेतकरी सांगत आहेत. एकीकडे हा सर्व उत्पादन खर्च वाढत असतानाच, दुसरीकडे दूध खरेदीदार कंपन्यांकडून गेल्या महिन्यामध्ये दुधाचा दर प्रति लिटर एक रुपयाने कमी करण्यात आला आहे. त्यामुळे सध्या शेतकऱ्यांना प्रति लिटर दुधासाठी अवघा ३७ रुपये भाव मिळत आहे. सध्या गोळी पेंड, खपरी पेंड, भुसा, सुकी वारली आणि मक्याचा भरडा या सर्वच पशुखाद्यांच्या भावात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. कच्च्या मालाचे वाढलेले भाव आणि




डिझेलच्या वाढत्या किमतींचा थेट परिणाम पशुखाद्याच्या वाढीव दरावर झाला आहे.

आष्टी तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणावर दुधाचा व्यवसाय केला जातो आणि येथून दररोज लाखो लिटर दूध उत्पादित होत असल्याने आष्टी तालुका हा दूध उत्पादनात संपूर्ण मराठवाड्यात अव्वल मानला जातो. या तालुक्यात बाहेरील दूध खरेदीदार कंपन्या मोठ्या प्रमाणात दुधाची खरेदी करत असल्याने आजवर शेतकऱ्यांच्या हातात चार पैसे शिल्लक राहत होते. परंतु, आता हिरवा चारा, कडबा, ऊस आणि पशुखाद्याच्या गगनाला भिडलेल्या भावामुळे हा व्यवसाय शेतकऱ्यांना पूर्णपणे परवडत नसल्याचे चित्र निर्माण झाले आहे. पशुखाद्याचे आणि चाऱ्याचे भाव ज्या पटीत वाढले आहेत, त्याच तुलनेत दुधाचे भाव देखील वाढवले जावेत, अशी रास्त अपेक्षा सध्या आष्टी तालुक्यातील हवालदिल झालेल्या दूध उत्पादक शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे.

### दूध दरात वाढ करण्याची शेतकऱ्यांची मागणी

उत्पादन खर्चात अफाट वाढ झालेली असताना कंपन्यांकडून मात्र दुधाचे भाव पाडले जात आहेत. सध्या मिळत असलेल्या ३७ रुपये प्रति लिटर भावामध्ये जनावरांचा चारा-पाणी, पशुखाद्य आणि मजुरीचा खर्चही निघत नाही. त्यामुळे सरकारने आणि दूध कंपन्यांनी परिस्थितीचा गांभीर्याने विचार करून, पशुखाद्याच्या वाढत्या दराच्या तुलनेत दुधालाही योग्य आणि वाढीव भाव द्यावा, अशी मागणी आष्टी तालुक्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांनी केली आहे.

### बाजारपेठेतील पशुखाद्याचे सरासरी दर

सध्या बाजारपेठेमध्ये भुसा (49 किलो) 1350 ते 1500 रुपये, गोळी पेंड 1400 ते 1850 रुपये, सरकी पेंड 2000 ते 2200 रुपये, शेंगदाणा 2500 ते 3000 रुपये, सुकी बार्ली 1400 ते 1500 रुपये, मका भरडा (45 किलो) 1200 ते 1250, मका भरडा (50 किलो) 1300 ते 1360 रुपये याप्रमाणे पशुखाद्य मिळत आहे. गेल्या दोन महिन्याच्या तुलनेमध्ये या महिन्यांमध्ये पशुखाद्यामध्ये शंभर ते दोनशे रुपयापर्यंत वाढ झाली असून शेंगदाणा पेंड मध्ये तब्बल प्रति किलो दहा रुपयांनी वाढ या महिन्यात झाली आहे.

### कच्च्या मालाच्या भाव वाढीचा परिणाम

बाजारामध्ये पशुखाद्य तयार करण्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या किमतीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे गेल्या दोन महिन्यापासून पशुखाद्यांचे दर वाढत आहेत. डिझेलच्या वाढलेल्या किमतीचा ही पशुखाद्याच्या दरवाढीवर परिणाम होत आहे. सध्या डिझेलचे भाव वाढत असल्याने भविष्यामध्ये देखील पशुखाद्यामध्ये वाढ होण्याची चिन्हे आहेत.
- सुरेश वायकर, शृंगेरी पशुखाद्य आष्टी

### चाऱ्याचे भाव गगनाला भिडले

गेल्या वर्षीच्या तुलनेमध्ये चाऱ्याचे भाव देखील मोठ्या प्रमाणात वाढलेले आहेत. गेल्या वर्षी कडबा 2000 ते 2500 रुपये शेकड्याने मिळत होता तर यावर्षी कडब्याचे भाव हे 4000 ते 5000 रुपये शेकड्याप्रमाणे झाले आहेत. त्याचबरोबर 3000 ते 3200 प्रति टन मिळणारा ऊस यावर्षी 4000 ते 4200 रुपये प्रति टनाने मिळत आहे. मका 800 ते 1000 रुपये गुंठा मिळत होती यावर्षी मकाचे भाव देखील 1000 ते 1500 प्रति गुंठा एवढे प्रचंड वाढले आहेत. वाहतूक आणि मजुरांची मजुरी देखील मोठ्या प्रमाणात वाढल्याने दूध उत्पादक शेतकरी अडचणीत सापडला आहे.

# तमाशासम्राट रघुवीर खेडकर यांना 'पद्मश्री' सन्मान; महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचा गौरव

महाराष्ट्राच्या मातीतील अस्सल लोककला 'तमाशा' क्षेत्रासाठी एक ऐतिहासिक आणि अभिमानास्पद क्षण म्हणजे तमाशा पंढरीचे आधारस्तंभ आणि खेडकरांच्या तमाशा मंडळाचे ज्येष्ठ कलावंत रघुवीर खेडकर यांना केंद्र सरकारने प्रतिष्ठेच्या 'पद्मश्री'पुरस्काराने सन्मानित केले आहे. लोककलेच्या क्षेत्रात दिलेल्या प्रदीर्घ, निस्वार्थी आणि अमूल्य योगदानाची दखल घेत भारत सरकारने या सर्वोच्च नागरी पुरस्काराने त्यांच्या कारकिर्दीवर मोहोर उमटवली आहे.

तमाशा सम्राट रघुवीर खेडकर यांचे नाव तमाशा विश्वात एका वटवृक्षासारखे आदराने घेतले जाते. खेडकर कुटुंब हे महाराष्ट्राच्या तमाशा परंपरेतील एक अग्रगण्य नाव आहे. रघुवीर खेडकर यांनी वडील ज्येष्ठ तमाशा कलावंत तुकाराम खेडकर आणि आई तमाशा सम्राज्ञी कांताबाई सातारकर यांच्याकडून मिळालेला कलेचा वारसा केवळ जतन केला नाही, तर तो अत्यंत समर्थपणे पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवला.

त्यांच्या कुटुंबाचे योगदान केवळ एका व्यक्तीपुरते मर्यादित नसून, संपूर्ण खेडकर घराण्याने दशकानुदशके तमाशा फडाच्या माध्यमातून ग्रामीण महाराष्ट्राचे प्रबोधन केले आहे. रघुवीर खेडकर यांच्यासोबत त्यांच्या कुटुंबातील इतर सदस्यांनीही या लोककलेला ग्लॅमर आणि प्रतिष्ठा मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. तमाशा फडातील शिस्त, वगनाट्याची मांडणी आणि लावणीच्या सादरीकरणातील शुद्धता राखण्यासाठी खेडकर कुटुंबाने नेहमीच अग्रक्रम दिला आहे.

तमाशा क्षेत्रातील त्यांच्या योगदानाबद्दल त्यांना 'तमाशा महर्षी' म्हणून ओळखले जाते. त्यांनी तमाशाचा वापर केवळ मनोरंजनासाठी न करता सामाजिक प्रश्नांवर भाष्य करण्यासाठी आणि प्रबोधनासाठी केला आहे.

कोरोना महामारीत तमाशा कलावंतांवर



उपासमारीची वेळ आली होती, त्यावेळी त्यांनी 'महाराष्ट्र राज्य ढोलकी फड तमाशा संघटनेचे' अध्यक्ष म्हणून पुढाकार घेत कलावंतांच्या हक्कांसाठी मोठा लढा दिला.

अनेक दशकांच्या प्रदीर्घ कारकिर्दीत रघुवीर खेडकर यांनी प्रतिकूल परिस्थितीतही कलेशी तडजोड केली नाही. ग्रामीण महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जाऊन त्यांनी तमाशाच्या माध्यमातून सामाजिक संदेश देण्याचे कार्य केले आहे. त्यांच्या अभिनयातील कसदारपणा आणि संवादफेकीतील धार यामुळे त्यांनी रसिक प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले आहे. केवळ मनोरंजनच नव्हे, तर तमाशा या कलेला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न कौतुकास्पद आहेत. त्यांनी शेकडो कलाकारांना आपल्या मार्गदर्शनाखाली घडवून त्यांना व्यासपीठ मिळवून दिले आहे, ज्यामुळे अनेक नवीन पिढीचे कलाकार आज लोककलेच्या क्षेत्रात कार्यरत आहेत.

तमाशा हा महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा आहे. अनेकदा लोककलाकारांकडे दुर्लक्ष होते, अशी खंत व्यक्त केली जाते. अशा वेळी रघुवीर खेडकर यांच्यासारख्या धुरंधर कलावंताला मिळालेला 'पद्मश्री' सन्मान हा केवळ त्यांच्या वैयक्तिक कार्याचा गौरव नसून, तो संपूर्ण तमाशा फडाचा आणि महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचा झालेला सन्मान आहे. यामुळे लोककलेकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन अधिक सकारात्मक होईल, अशी भावना व्यक्त होत आहे.

पद्मश्री प्रदान होताच राज्यभरातील नाट्य, चित्रपट आणि साहित्य क्षेत्रातून रघुवीर खेडकर यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. ज्येष्ठ कलाकारांनी त्यांच्या कार्याचे कौतुक करताना म्हटले आहे की, "हा पुरस्कार खऱ्या अर्थाने लोककलेचा मान उंचावणारा आहे. खेडकर यांनी तमाशा या कलेला जी उंची मिळवून दिली, ती पुढील अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल."

रघुवीर खेडकर यांना मिळालेला हा सन्मान तमाशा कलेला एक नवी ऊर्जा देणारा ठरेल आणि मराठी लोकसंस्कृतीच्या इतिहासात त्यांच्या या कार्याची नोंद सुवर्णअक्षरांनी केली जाईल, यात शंका नाही.

# युवा सेनेचे कैलास कावरे यांनी सिरसाळा भोगवटाधारकांचा प्रश्न उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे मुंबईत लावून धरला

**सिरसाळा | अतुल बडे**

सिरसाळा येथील भोगवटाधारकांचा गेल्या चार दशकांपासून प्रलंबित असलेला मालकी हक्काचा प्रश्न आज थेट राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर युवासेनेचे परळी विधानसभाप्रमुख कैलास कावरे यांनी हा प्रश्न लावून धरताच राज्याचे उपमुख्यमंत्री नामदार एकनाथजी शिंदे यांच्या वतीने तातडीने हालचाली झाल्या.

आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर युवासेना परळी विधानसभाप्रमुख कैलास कावरे यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांची भेट घेऊन त्यांच्याकडे सिरसाळा येथील भोगवटाधारकांच्या ज्वलंत प्रश्नाकडे लक्ष वेधले. सिरसाळा शहरातील गेल्या अनेक वर्षांपासून मालकी हक्काच्या पीटीआर अभावी शासकीय योजनांपासून येथील नागरिकांना वंचित राहावे लागत असल्याने कैलास कावरे यांनी हा प्रश्न मांडताच, शिंदे साहेबांनी निर्देश देत साहेबांचे विशेष कार्यकारी अधिकारी यांनी तात्काळ बीड येथील जिल्हाधिकारी यांना फोनद्वारे सूचना दिल्या. सिरसाळा येथे भोगवटधारकांचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून रखडल्याने हा प्रश्न लवकरात लवकर निकाली काढण्यासाठी प्रयत्न करावा", असा स्पष्ट निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने देण्यात आला.

### जिल्हाधिकारी कटिबद्ध

विशेष कार्यकारी अधिकारी यांच्या फोन सूचनेनंतर बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांनी सुद्धा या प्रकरणी लवकरात लवकर योग्य



तो सकारात्मक निर्णय घेण्यासाठी कटिबद्ध असल्याचे यावेळी एकनाथ शिंदे साहेब यांचे विशेष कार्यकारी अधिकारी यांच्या शी फोनवर बोलताना सांगितले परळी मतदारसंघातील सर्वात मोठ्या ग्रामपंचायतीपैकी एक असलेल्या सिरसाळा शहरातील गेल्या चार दशकांपासून भोगवटाधारकांना मालकी हक्क मिळावा यासाठी संघर्ष सुरू आहे. "सिरसाळा शहरातील सुमारे 60% पेक्षा अधिक कुटुंबे गेल्या चार दशकांपासून मालकी हक्काच्या PTR अभावी पंतप्रधान आवास योजना, घरकुल योजना व पीक कर्जापासून वंचित आहेत. सातबारा नावावर नसल्याने बँका कर्ज देत नाहीत, त्यामुळे नागरिकांचे प्रचंड आर्थिक नुकसान होत आहे. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्र्यांनी दिलेले निर्देश निर्णायक ठरतील, असा विश्वास कावरे यांनी व्यक्त केला हा प्रश्न लवकरात लवकर निकाली लागावा यासाठी सिरसाळा वाशीयांना आशा आहे युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण ,युवासेना जिल्हाप्रमुख ऋषिकेश लोमटे ,सिरसाळा शिवसेनेचे सरपंच शेख नशीब भाई यांच्या मार्गदर्शनाखाली युवा सेना विधानसभाप्रमुख कैलास कावरे यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री नामदार एकनाथजी शिंदे साहेब यांच्याकडे निवेदन दिले सिरसाळाकरांना न्याय मिळेपर्यंत मंत्रालयाचे दरवाजे ठोठावत राहू" सिरसाळ्यातील भोगवटाधारकांना मालकी हक्क भेटत नाही तोपर्यंत हा लढा शिवसेनेचे सरपंच शेख नशीब भाई यांच्या नेतृत्वाखाली अखेरपर्यंत सुरू ठेवण्याचा निर्धार युवासेनेचे परळी विधानसभाप्रमुख कैलास कावरे यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात व्यक्त केला आहे.

# पत्रकार प्रविण पोकळे यांच्यावर राजकीय नेते, स्नेही मित्रांनी केला शुभेच्छांचा वर्षाव

**आष्टी (प्रतिनिधी)**

विनयशील लेखणीचा ध्यास घेत सुखदुःखांना व्यक्त करणाऱ्या पत्रकार प्रविण पोकळे यांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त आ.सुरेश धस,खा.बजरंग सोनवणे,खा.निलेश लंके,डीसीपी बजरंग बन्सोडे,युवा नेते जयदत्त धस,सागर धस,गणेश शिंदे,माऊली जरांगे नगराध्यक्ष जिया बेग,सभापती बद्रीनाथ जगताप,प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे,जेष्ठ प्रफुल्ल सहस्त्र बुद्धे,जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे,

विनोद रोडे,राजेंद्र धोंडे,अशोक चौधरी,दीपक बांगर,तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे,विजय मेहेर,प्रविण वारे,रामहरी महानोर,यशवंत खंडागळे,हनुमंत गळगटे,नगरसेवक शरीफ शेख,गणेश डोंगरे, दत्ता हुले,प्रजापत्रचे संपादक संजय मालानी संपादक समीर लव्हारे,पोलीस अशोक दुबाले,सोमनाथ गायकवाड, पभाऊसाहेब भवर, अभिजित शेंडगे,खंडू जाधव,गौतम आजबे,अँड.शेकडे, अँड.बाळासाहेब मोरे,प्रदिप थोरवे,प्रितम बोगावत,किशोर शेळके, इंजि. पी.बी.बोडखे,राजेंद्र दहातोंडे,सरपंच परिवंत गायकवाड,रामशेठ मधुरकर,पोपट धुमाळ,अँड.



राकेश हंबर्डे,अँड.बाळासाहेब झांबरे,अँड. कांतीलाल गव्हाणे, अँड.गव्हाणे,अँड.झांजे,अँड. महादेव मोहिते,अँड.बापासाहेब खिलारे,अँड.उद्धव पोकळे, अँड.सय्यद,अँड.किशोर मुळे,सरपंच पंडीत पोकळे,सोमनाथ वाळके, शिंदे सर,अमर वाळके,मुकेश काळे,भगवान शिनगिरे,किरण शिनगारे,अरुण सायकड, एस.पी.बोडखे, सतीश जंगले,भीमराव गुरव,गणेश दळवी,शरद तळेकर,रघुनाथ कर्डिले,शरद रेडेकर,संतोष सानप,सचिन रानडे,डॉ.विनोद ढोबळे,मनोज पोकळे,मा.सरपंच अतुल कोठुळे,सरपंच संदीप मार्कंडे,सरपंच पोपट शिरोळे,उद्योजक भागचंद वाघ,आशिष अग्रवाल, विकास धात्रिक,केदार जगताप,मनोज धनवडे,सागर ढोले,कुंडलिक सोनटक्के,पिंकू बळे,नगरसेवक अक्षय धोंडे,अजित मुळे,नितीन खिळे,शहादेव धनवडे,नागेश करांडे संतोष शेटे,अनिल शेंबडे, उमेश सातपुते,अशोक पोकळे, बाळासाहेब



बोराडे,मनोहर सरोदेसाहेब,किरण शेठ पोठरे,अँड. अशोक गवारे,मा.उपसरपंच मारुती पवार,उपसरपंच हराळ,सरपंच दत्तात्रय खोटे,सूरज शिंदे, अशोक परकाळे,राजेंद्र जरांगे,संदीप जाधव,शरद गायकवाड, सचिन काकडे,सरपंच संदीप खेडकर, संजय खोटे,कपिल अग्रवाल, अँड. महादेव मोहिते,शिवम हंबर्डे, सुरज रोकडे कृष्णा धोंडे विजय धोंडे बापूराव गुरव योगेश कुंभकर्ण सचिन काळे भोसले मेजर तय्यब सर सय्यद शफी नगरसेवक किशोर झरेकर आत्माराम फुंदे राजेंद्र लाड,अण्णासाहेब साबळे,जयचंद नेलावड, शहादेव नरोडे,पांडुरंग पोकळे,योगेश कुंभकर्ण, शशिकांत डोमकावळे,आकेश वाडेकर,के.के.काकडे, बन्सी पोकळे अमृत पोकळे संजय पोकळे प्रवीण भूकन, किरण शिनगरे उद्धव गरजे निशांत सेवे ऋषिकेश स्वप्नील जोगदंड श्रीकांत जगताप अशोक ढवण विकास शिरसागर सरपंच भरत भवर उमेश जगताप शरद गर्जे,यांच्यासह सामाजिक,राजकीय धार्मिक क्षेत्रातील मान्यवर,विविध पक्षांचे राजकीय नेते,कार्यकर्ते,विविध सामाजिक संघटना,पक्ष यांच्यावतीने सत्कार,सन्मान करत भावी आनंदी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. दिवसभर शुभेच्छांचा वर्षाव पाहून पोकळे परिवारातील सदस्य भारावून गेले.

२५ मे २०२५ प्रविण पोकळे यांचा अभिष्टचिंतन दिन होता.आष्टी शहर व तालुक्यातील नागरिक, विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी विविध राजकीय पक्षांचे ज्येष्ठ नेते,कार्यकर्ते, विविध संघटनांचे पदाधिकारी, शेतकरी संघटनेचे, शिक्षण, समाजकारण, धार्मिक आर्थिक, वैचारिक,सामाजिक क्षेत्रातील विविध समाजधुरीण आणि गुणी जणांनी भ्रमणध्वनीवरून आणि प्रत्यक्ष भेटून सत्कार सन्मान करून पोकळे परिवाराच्या कार्याला शुभेच्छांच्या माध्यमातून बळ दिले.क्षणाक्षणाला येणाऱ्या भ्रमणध्वनीवरील शुभेच्छा,सत्काराचे विविध फेटे,शाल श्रीफळ यांच्यासह दाखवलेले प्रेम आणि भावना.या आपल्या कार्य कार्यकर्तृत्वाला निश्चित ऊर्जा देतात अशी भावना यावेळी पत्रकार प्रविण पोकळे यांनी नमूद केली.